# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**कालमर्यादीत**

क्रमांक विकाअ/शिक्षण/ई.बी.सी./२०१५/2895

दिनांक :- 20 NOV 2015

प्रति,

प्राचार्य,
सर्व विना-अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी संस्था,
सर्व विना-अनुदानित एम.बी.ए./एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था,

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक १५/तंशिस/अर्थस/ईबीसी-ऑफलाईन-फॉर्म/२०१५/१५२ दिनांक १ ऑक्टोम्बर २०१५.
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ई.बी.सी./२०१५/२४४५ दि. ३/१०/२०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये शासनाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीबाबत आकडेवारीसाठी विद्यार्थ्यांचे ईबीसी अर्ज ऑफ लाईन **(Proforma –1 मध्ये )** संस्थांनी विद्यार्थ्यांकडून दिनांक २३ ऑक्टोम्बर २०१५ पर्यंत भरुन घ्यावेत. व सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन झाल्यानंतर आपल्या स्तरावर छाननी करुन सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रासह या कार्यालयात दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ पर्यंत जमा करावेत व त्याची माहिती अभ्यासक्रम निहाय संस्थांनी त्यासोबत जोडलेल्या विवरण पत्रामध्ये **(Proforma –2 मध्ये )**सॉफ्ट व हार्ड कॉपीसह (Excel Format 2003) मध्ये **दिनांक १० नोव्हेंबर २०१५** पर्यंत या कार्यालयास सादर करण्याबाबत कळविलेले आहे. तथापी असे निदर्शनास आले की, ब-याच संस्थांनी अजुनपर्यंत माहीती या कार्यालयास सादर केलेली नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, सदर माहीती दिनांक २४/११/२०१५ पर्यंत या कार्यालयास सादर करावी, अन्यथा आपल्या संस्थेची माहिती निरंक समजण्यात येऊन तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना सादर करण्यात येईल, त्यामुळे भविष्यात आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपली राहील, याची नोंद घ्यावी.

**सहपत्रे** :- वरीलप्रमाणे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

F:\backup kadam\all Manish letter 30.doc